कामगार आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.

**विषय : महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक २८.०२.२०१७ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्तांत.**

मा. मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता, कामगार, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिक यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची दिनांक २८.०२.२०१७ रोजी दुपारी ०२.०० वा. सह्याद्री अतिथीगृह, मलबार हील, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. ना. श्री. संभाजी पाटील निलंगेकर | मा. मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता, कामगार, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिक कल्याण. |
| २. | श्री. ओमप्रकाश (मुन्ना) यादव | मा. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ. |
| ३. | श्री. यशवंत केरुरे | मा. कामगार आयुक्त (शासकीय प्रतिनिधी) |
| ४. | श्री. स.अ.मु. नकवी | मा. संचालक व लेखा कोषागारे |
| ५. | श्रीमती श्वेता सिंघल | मा.उपसचिव (कामगार) |
| ५. | श्रीमती वेदा आगटे | मालक प्रतिनिधी |
| ६. | श्री. सतीश मगर | मालक प्रतिनिधी |
| ७. | श्री. अशोक भुताड | कामगार प्रतिनिधी |
| ८. | श्री. श्रीपाद कुटासकर | कामगार प्रतिनिधी |
| ९. | श्री. विजय देवरुखकर | कामगार प्रतिनिधी |

बैठकीच्या सुरुवातीस मंडळाच्या सचिव यांनी मा. मंत्री महोदयांचे व सर्व उपस्थितांचे स्वागत करुन बैठकीत चर्चा करावयाच्या विषयांशी संबंधित कागदपत्रांचा संच सर्व उपस्थितांना वाटप करण्यात आला.

तद्नंतर विषयसुचिला सुरुवात करण्यापुर्वी मंडळाचे अधिकार काय आहेत? व मंडळास प्रत्येक वेळी शासनमान्यतेची आवश्यकता का आहे? ते उपस्थित सदस्यांना सांगण्यात यावे. असे निदेश मा. अध्यक्ष यांनी मंडळाच्या सचिव यांना दिले. त्यावर मंडळाच्या सचिव यांनी अधिनियमामध्ये मंडळाचे अधिकाराबाबत उल्लेख करण्यात आलेला नाही. तथापि. मंडळाची कार्ये (Functions) काय आहेत हे स्पष्टपणे **"इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६"** मधील कलम २२ मध्ये नमूद करण्यात आली असून त्यामधील मंडळाची कार्ये उपस्थित सदस्यांना वाचुन दाखविण्यात आली. एकंदरीत नोंदित बांधकाम कामगारांसाठी कल्याणकारी योजना तयार करणे व त्या राबविणे अशी कार्ये कायद्यात नमुद आहेत असे स्पष्ट केले.

त्यावर मा. अध्यक्ष यांनी मंडळाचे अधिकार काय आहेत याची नियमावली तयार करण्यात यावी असे प्रस्तावित केले व त्यामध्ये मंडळाच्या कामासाठी मंडळासच १००% अधिकार असतील. त्यास शासनमान्यतेची आवश्यकता असणार नाही असे नमूद करावे असेही सांगितले. यावर मा. संचालक (लेखा व कोषागारे) व कामगार प्रतिनिधी श्री. कुटास्कर मंडळाच्या कामकाजासाठी मार्गदर्शक तत्वे तयार करण्यात यावी असे प्रस्तावित केले.

याबाबत बोलताना मा. कामगार आयुक्त यांनी सहसचिव (कामगार) यांनी दिनांक २४.१०.२०१३ रोजी मंडळास पाठविलेल्या शासन परिपत्रकाचा उल्लेख केला सदर परिपत्रकानुसार महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार नियम, २००७ मधील नियम ४६ अन्वये शासन जे आदेश सदर स्थापीत मंडळास देईल त्याची अंमलबजावणी करणे मंडळास बंधनकारक आहे. त्यामुळे शासनाने उक्त

परिपत्रकान्वये असे निर्देश दिले आहेत की. मंडळाने पारीत केलेल्या योजनांची / ठरावांची अंमलबजावणी करण्यापूर्वी शासनाची पुर्व अुनमती घेण्यात यावी. मंडळाच्या दैनंदिन खर्चास सदर आदेश लागू राहणार नाहीत. असेही उक्त परिपत्रकामध्ये नमूद करण्यात आले असल्याचे व त्यामुळे प्रत्येक ठरावाची अंमलबजावणी स्वतंत्रपणे मंडळस्तरावर करणे शक्य होत नाही. असे मा. कामगार आयुक्त यांनी सर्व उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिले. यावर मा. मंत्री महोदय यांनी मंडळ हे स्वायत्त असून त्यानुसार कार्यवाही करावी असे आदेशीत केले.

मा. मंत्री महोदय यांनी मंडळात जवळपास ५ लाख कामगार नोंदित आहेत त्यांना आपण २ वर्षाच्या कालावधीमध्ये काय लाभ देवू शकलो असा मुद्या उपस्थित केला. सदर मुद्याबाबत बोलताना मंडळ सचिव यांनी मंडळामार्फत सुमारे ४ लाख कामगारांना विविध योजनांचा लाभ देण्यात आलेला आहे व सदर योजनांच्या लाभाची रक्कम सुमारे २५२ कोटी आहे. असे सर्व उपस्थितांच्या निर्दशनास आणुन दिले. त्याचप्रमाणे ज्या योजना राबविण्यात आल्या आहेत त्याचा लाभ कामगारांना देणे चालु आहे व त्यांचा अंदाजित वार्षिक खर्च सुमारे ५० कोटी आहे असेही सर्वांच्या निर्दशनास आणून दिले.

तद्नंतर विषयसुचीनुसार पुढील चर्चा करण्यात आली.

# बैठकीची विषयसूची

| अ.क्र. | विषय | घेण्यात आलेला निर्णय |
|---|---|---|
| १. | **मागील बैठकीचे इतिवृत्तांत कायम करणे.** | मंडळाच्या मागील बैठकीच्या इतिवृत्तांतास सर्व उपस्थितांनी मान्यता दिली. |
| २. | **मंडळाचे एकात्मिक कामकाज संगणकीय प्रणालीनुसार बाहययंत्रणेद्वारे करण्यासाठी तयार केलेल्या RFP Document बाबत.** | मंडळाच्या सचिव यांनी सर्व उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिले की, मंडळाच्या दि. ३०.०७.२०१४, दि.२६.०८.२०१५ व दि. ०१.१०.२०१५ रोजी पार पडलेल्या बैठकीमध्ये बांधकाम कामगार नोंदणीसाठी आवश्यक माहिती/कागदपत्रे जमा करण्यासाठी बाहय यंत्रणेची नियुक्ती करण्याचा ठराव घेण्यात आला. तसेच मंडळाच्या दि. ०२.११.२०१५ रोजी झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने RFP Document तयार करण्यासाठी मे. अर्न्स्ट अ‍ॅन्ड यंग एल.पी.पी. या कंपनीच्या Consultant ची नियुक्ती करण्यात आली.<br><br>मंडळाच्या कामकाजाचे एकात्मिक संगणकीय प्रणालीच्या अंमलबजावणी, संचालन व देखभालीकरिता व्यवस्थापन सेवाप्रदात्याच्या (Management Service Provider) निवडीचे (RFP) Document बनवून घेवून कामकाजाचे एकात्मिक |

Desk 30/56...

| | | |
|---|---|---|
| | | संगणकीय प्रणालीद्वारे मंडळाचे कामकाज कशा पद्धतीने करण्याचे प्रस्तावित आहे. याबाबत मंडळाच्या दिनांक २९.०३.२०१६ रोजी पार पडलेल्या बैठकीमध्ये मंडळासमोर सविस्तर सादरीकरण करण्यात आले होते.<br><br>मंडळाच्या दिनांक १६.०६.२०१६ रोजी पार पडलेल्या बैठकीमध्ये पुन्हा त्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली असून सदर RFP Document वर शासनाच्या प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या (Project Implementation Committee) दिनांक ०४.०६.२०१६ रोजी झालेल्या बैठकीमध्ये तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. तसेच, सदर प्रस्तावास दि.१२.०८.२०१६ रोजी संपन्न झालेल्या उच्चाधिकार समितीच्या (High Power Committee) बैठकीमध्ये देखील मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. मंडळांतर्गत नियुक्त करण्यात आलेल्या Consultant नी प्रकल्पाच्या अटी व शर्ती पुन्हा एकदा मंडळासमोर दिनांक ०३.०९.२०१६ च्या मंडळ बैठकीत सादर केल्या. सदर बैठकीत मंडळांतर्गत कामकाजाचे एकात्मिक संगणकीय प्रणाली बाह्ययंत्रणेमार्फत तयार करुन घेणेबाबत शासनाच्या HPC कमिटीच्या बैठकीचे इतिवृत्तांत/मान्यता प्राप्त झाल्यानंतर ई-निविदा प्रसिध्द करण्याचा ठराव सर्वानुमते संमत करण्यात आला. |

सदर प्रकल्पाकरीता व्यवस्थापन सेवा प्रदाता (MIS) च्या निवडीसाठी माहिती व तंत्रज्ञान विभागाकडून ई-निविदा दि. ०६.१२.२०१६ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली असून ई-निविदा दिनांक १६.०१.२०१७ रोजी उघडण्यात आली आहे. सदर ई-निविदा प्रक्रियेत ०३ संस्थांनी भाग घेतला होता.

तथापि, शासन उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांचे पत्र क्र. अबाका-२०१६/५११/प्र.क्र.१७५/काम-७.दिनांक १३.०१.२०१७ च्या अन्वये मा. मंत्री (कामगार) यांनी "**ई-निविदा प्रक्रियेस स्थगिती द्यावी**" असे निर्देश मा. प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, मंत्रालय, मुंबई यांना दिले आहेत. त्याअनुषंगाने आवश्यक ती पुढील कार्यवाही करावी असेही कळविले आहे.

वरील बाबी पाहता सदर RFP प्रकल्पाची संपूर्ण प्रक्रीया अद्याप पुर्ण झालेली नसल्याने मंडळ व शासन मान्यतेच्या अधिन राहुन मा. अध्यक्ष यांच्या पुर्वपरवानगीने सेवा प्रदाता कंपनी मे. अर्न्स्ट अ‍ॅन्ड यंग एल पी पी, यांना दिनांक २२.१२.२०१६ पासून सदर RFP प्रकल्प कार्यान्वित होईपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

त्यावर मा. मंत्री महोदय यांनी RFP बाबत चर्चा करतांना IT Department ने RFP Document मध्ये फक्त बांधकाम कामगार असा उल्लेख केला आहे. नाका कामगार, मनरेगा कामगार, राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग व इतर रस्ते यावर काम करणारे कामगार यांना पुर्णपणे वगळण्यात आलेले आहे. तसेच सदर RFP मध्ये BOCW चे कामकाजामधील कामगारांची नोंदणी, त्यांना देण्यात येणारे लाभ, त्यांचेसाठी राबविण्यात येणाऱ्या योजना यांचे अधिक सुलभीकरण करणे. तसेच मंडळाचे उत्पन्न वाढविण्याचे दृष्टीने करावयाचे उपाययोजनेचा सुध्दा सदर RFP मध्ये समावेश असणे गरजेचे आहे, असे सांगितले. त्यामूळे पुर्वी तयार करण्यात आलेले RFP Document रद्द करण्यात यावे. सदर कामासाठी शासनाकडुन नेमण्यात आलेल्या पाच IT Consultant पैकी KPMG या IT Consultant ची नियुक्ती या कामासाठी करण्यात यावी व त्यांचेकडून सदर कामाचे नव्याने RFP Document तयार करून घेण्यात यावे, असे आदेश मा. मंत्री महोदय यांनी दिले. तसेच नव्याने तयार करण्यात आलेल्या RFP Document मंडळाचे बैठकीसमोर ठेवून त्यावर सविस्तर चर्चा करून त्यास मंडळाची मान्यता घेवून पुन्हा ई-निविदा मंडळ स्तरावर प्रसिद्ध करण्यात यावी, असेही मा. मंत्री

महोदय यांनी सूचित केले.

मंडळाच्या सचिव यांनी सध्या मे. अन्स्ट ॲन्ड यंग या IT Consultant ला काम देण्यात आले आहे. त्यांच्या बाबतीत काय करावे याबाबत मार्गदर्शन मागितले. त्यावर त्यांची सेवा रद्द करावी. अशी सूचना मा. मंत्री महोदय यांनी केली.

तथापि. मा. मुख्यमंत्री महोदय यांचे अधिपत्याखालील सामान्य प्रशासन (माहिती तंत्रज्ञान) विभागाने शासन निर्णय दि. ०९.०८.२०१६ अन्वये माहिती तंत्रज्ञान विषयी सविस्तर निर्देश दिलेले आहेत. या शासन निर्णयानुसार सदर निर्देश हे राज्य शासनाचे सर्व विभाग व त्यांच्या अधिनस्त सर्व क्षेत्रीय कार्यालय. सार्वजनिक उपक्रमे. महामंडळे यांना बंधनकारक असून. अशा सर्व कार्यालयांना केंद्र शासनाच्या, राज्य शासनाच्या दर करारानुसार किंवा इतर कुठल्याही यंत्रनेव्दारे माहिती तंत्रज्ञान विषयक संयंत्रे. साधन सामुग्री व सेवा. मनुष्यबळ उपलब्ध करुन घेण्यावर प्रतिबंध राहील असे नमूद केले आहे. त्यामुळे शासन मान्यतेशिवाय मंडळ स्तरावर RFP ची निवीदा काढता येईल किंवा कसे याबाबत मा. कामगार आयुक्त यांनी मुद्दा उपस्थित केला त्यावर मा. मंत्री महोदय यांनी मंडळ हे स्वायत्त असून सदर प्रस्तावास शासन म्हणून मी मान्यता देत आहे असे नमूद

| | | |
|---|---|---|
| | | केले.<br><br>याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.<br><br>**ठराव: मंडळांतर्गत कामकाजाचे एकात्मिक संगणकीय प्रणाली बाह्ययंत्रणेमार्फत तयार करुन घेणेबाबत तयार करण्यात आलेले RFP Document व ई-निविदा रद्द करण्यात यावी. मंडळामार्फत नियुक्त करण्यात आलेले IT Consultant मे. अर्न्स्ट ॲन्ड यंग एल पी पी यांची नियुक्ती रद्द करण्यात यावी. त्याऐवजी KPMGया IT Consultant ची नियुक्ती करण्यात यावी व त्यांचेकडून सदर कामाचे नव्याने RFP Document तयार करून घेण्यात यावे. नव्याने तयार करण्यात आलेल्या RFP Document मंडळाचे बैठकीसमोर ठेवून त्यावर चर्चा करून त्यास मंडळाची मान्यता घेवून पुन्हा मंडळ स्तरावर ई-निविदा प्रसिद्ध करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.** |
| ३. | **नोंदित बांधकाम कामगारांच्या कौशल्यवृध्दी (RPL Scheme) योजनेबाबत.** | याबाबत बोलताना सहाय्यक कामगार आयुक्त, श्री चंद्रकांत राऊत यांनी असे नमूद केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दि.०३.०९.२०१६ च्या बैठकीमध्ये व मा.मंत्री (कामगार) यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये |

कौशल्य वृध्दीकरण योजनेबाबत सविस्तर चर्चा होऊन Recognition of Prior Learning (RPL) for Construction workers या केंद्र शासनाच्या योजनेची अंमलबजावणी महाराष्ट्र राज्यातील नोंदीत बांधकाम कामगारांसाठी करण्याबाबत मंडळाची मंजुरी घेण्यात आली होती. त्या अनुषंगाने दि.२७.०९.२०१६ रोजी च्या पत्रान्वये शासन मंजुरीस प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

उपरोक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने पत्र दि. २७.०२.२०१७ अन्वये सदर योजनेची अंमल बजावणी करण्यासाठी मान्यता प्रदान केली आहे. त्यानुसार केंद्र शासनाने एमपॅनल केलेल्या खाली नमूद प्रशिक्षण संस्थांना तसेच प्रशिक्षणाची नियतकालीक तपासणी करण्यासाठी केंद्र शासनाने एमपॅनल केलेल्या तपासणी संस्थापैकी (ट्रेनिंग प्रोव्हायडर्स व असेसिंग बॉडीज) खालील संस्थांना महसुल विभाग निहाय नियुक्ती करण्यात येणार आहे.

| अ.क्र. | विभागाचे नांव | ट्रेनिंग प्रोव्हायडर्स | असेसींग बॉडीज |
|---|---|---|---|
| १ | कोकण विभाग | लेबरनेट सर्विसेस इंडिया प्रा.लि., बंगलोर | इंडिया स्किल्स न्यु दिल्ली. |
| २. | पुणे विभाग | आय एल अँन्ड एफ एस | इंडिया स्किल्स, न्यु |

| | | | |
|---|---|---|---|
| | | स्किल्स, नोएडा | दिल्ली |
| ३. | नाशिक विभाग | जी अॅन्ड जी स्किल्स डेव्हलपर्स प्रा.लि., पंचकुला | एकेजी, चंदीगड |
| ४. | नागपूर विभाग | सुशिल बहुउद्देशीय शिक्षण संस्था, नागपूर | शिक्षा भारती न्यु दिल्ली |
| ५. | औरंगाबाद विभाग | भास्कर फाऊंडेशन, दिल्ली | वर्च्युअल एज्युकेशन ट्रस्ट |

तसेच उक्त योजनेची अंमलबजावणी परिणामकारकपणे करण्यासाठी सद्यस्थितीत मंडळाकडे स्वतंत्र असे मनुष्यबळ नसल्यामुळे सदर प्रशिक्षणाच्या कामकाजाचे प्रमाणीकरण करणे, तसेच ट्रेनिंग प्रोव्हायडर आस्थापनांकडून दैनंदिन आढावा घेणे, विविध अभिलेख तयार करणे व संबंधित संस्थांबरोबर कामाचा आढावा घेऊन एकत्रित कार्यपुर्ती अहवाल मंडळास सादर करणे, इत्यादी कामासाठी अशा क्षेत्रात अनुभव असलेल्या एल. अॅन्ड टी. पनवेल, क्रेडाई, पुणे अशा पैकी एका नामांकित संस्थेची नेमणूक करुन त्यांच्यामार्फत या योजनेची देखरेख करुन योजना राबवावी असे प्रस्तावीत करण्यात येत आहे. असे श्री राऊत म्हणाले.

यावर मा. मंत्री महोदय यांनी असे निदेश दिले की, केंद्र शासनाकडून आलेल्या परिपत्रकानुसार ज्या पाच नामांकित संस्थांची शासनाने निवड केली आहे, त्या प्रत्येक संस्थेला विभाग वाटून देवून संबंधित कंपनीशी Agreement करून त्यांना कार्यारंभ आदेश देण्यात यावेत व त्यांच्यामार्फत या योजनेची अंमलबजावणी करण्यात यावी. तसेच सदर संस्थांच्या कामकाजावर देखरेख ठेवण्यासाठी स्वतंत्र संस्थेच्या नेमणूकीस असहमती दर्शवून ते काम मंडळामार्फत करण्यात यावे असे, मा. मंत्री महोदय यांनी स्पष्ट केले.

याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव : नोंदित बांधकाम कामगारांच्या कौशल्यवृध्दी (RPL Scheme) योजनेबाबत ट्रेनिंग प्रोव्हायडर्स (Training Providers) यांचेशी करारनामा करुन त्यांना कार्यारंभ आदेश देण्यात यावेत तसेच नियुक्ती करण्यात आलेल्या एजन्सीला कौशल्यवृध्दी (RPL Scheme) योजनेअंतर्गत जास्तीत जास्त लक्षांक देण्यात येऊन लक्षांक पुर्ती करून घेण्यात यावी, तसेच Assesment चे सुध्दा कामकाज संबंधित संस्थेकडून करून घेण्यात यावे, असा ठराव सर्वानुमते घेण्यात**

| | | |
|---|---|---|
| | | **आला.** |
| ४. | **योजनांची अंमलबजावणी करणेसाठी बाहय यंत्रणेची/ सल्लागार कंपनीची (Consultant) नियुक्ती करणेबाबत.** | सदर मुद्याबाबत बोलताना मंडळाच्या सचिव यांनी सर्व उपस्थितांच्या निर्दशनास आणुन दिले की, शासन असाधारण अधिसूचना क्र. इमारत-2013:प्र.क्र.104/कामगार-7 अ. दिनांक ११.१०.२०१३ अन्वये नोंदित बांधकाम कामगारांकरिता राबवावयाच्या विविध कल्याणकारी योजना अधिसूचित करण्यात आल्या आहेत. तसेच शासन पत्र दि. १६.०६.२०१६ अन्वये सदर कल्याणकारी योजनांच्या रक्कमेत वाढ करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच मंडळाच्या ठरावानूसार व शासन मान्यतेने सदर कल्याणकारी योजनांमध्ये वेळोवेळी वाढ होत असते. त्याअनुषंगाने नोंदित बांधकाम कामगारांसाठीच्या कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी मंडळाकडून करण्यात येते.<br>कायद्यांतर्गत नोंदणी झालेल्या लाभार्थ्याला योजनेचा लाभ मिळण्यासाठी नोंदणी प्राधिकाऱ्यांकडे विहित नमुन्यात आवेदन सादर करणे आवश्यक असते. मंडळ दाव्यांना मंजूरी दिल्यानंतर वित्तीय सहाय्याचे वाटप २०१५ पासून DBT पध्दतीने करण्यात येते.<br>मंडळाअंतर्गत डिसेंबर २०१६ अखेर ५,७५,६२८ इतक्या बांधकाम कामगारांची नोंदणी झालेली असुन त्यापैकी ३०२०९७ कामगारांची नोंदणी जिवित आहे.लाभार्थ्यांना |

अर्थसहाय्य वाटपामध्ये होणारा विलंब टाळण्यासाठी महाराष्ट्र शासनाने दि. २६.०५.२०१४ व दि. १८.०६.२०१४ रोजीच्या परिपत्रकान्वये सदर लाभ वाटपाचे अधिकार जिल्हा कार्यालयाच्या प्रमुखांना प्रदान करण्यात आलेले आहेत. नोंदणीकृत बांधकाम कामगारांनी विहित नमुन्यामध्ये कागदपत्रांसह आवेदन सादर केल्यानंतर क्षेत्रीय अधिका-याकडून त्याची पडताळणी करण्यात येते व त्यानूसार पात्र लाभार्थी कामगारांना योजनांच्या लाभाचे वाटप करण्यात येते.

मंडळाकडुन सद्यस्थितीत नोंदित बांधकाम कामगारांसाठी १९ विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. तथापि उपलब्ध मुनष्यबळ व कामाची व्याप्ती यांचा विचार करता योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी योग्य कार्यपध्दतीचा अवलंब करुन नोंदित बांधकाम कामगारांना विनाविलंब कल्याणकारी योजनांचा लाभ मिळण्यासाठी विशेष उपाययोजना करणे आवश्यक आहे.

त्यानुसार मंडळाचे कामकाजाची एकत्मिक संगणकीय प्रणाली विकसित करून घेण्यासाठी RFP Document तयार करून मंडळाच्या ठरावानूसार बाहय यंत्रणेची नियुक्त करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. सदर प्रकल्पाअंतर्गत नियुक्त करण्यात

येणाऱ्या संस्थेमार्फत बांधकामाच्या ठिकाणी जाऊन बांधकाम कामगारांना मंडळाच्या योजनांची माहिती देऊन त्यांचेकडून योजनांचे अर्ज भरून घेऊन ऑनलाईन पध्दतीने योजनाअंतर्गत लाभाचे वाटप करणे. हा सदर संस्थेच्या कामाचा भाग असणार आहे.

सदर प्रकल्पाकरीता व्यवस्थापन सेवा प्रदाता (MSP) च्या निवडीसाठी माहिती व तंत्रज्ञान विभागाकडून ई-निविदा दि. ०६.१२.२०१६ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली असून ई-निविदा दिनांक १६.०१.२०१७ रोजी उघडण्यात आली आहे.

तथापि. शासन उद्योग. ऊर्जा व कामगार विभाग यांचे पत्र क्र. अबाका-२०१६/५११/प्र.क्र.१७५/काम-७.दिनांक १३.०१.२०१७ च्या अन्वये मा. मंत्री (कामगार) यांनी "**ई-निविदा प्रक्रियेस स्थगिती द्यावी**" असे निर्देश मा. प्रधान सचिव माहिती व तंत्रज्ञान संचालनालय. मंत्रालय, मुंबई यांना दिले आहेत. त्याअनुषंगाने आवश्यक ती पुढील कार्यवाही करावी असेही कळविले आहे.

उक्त परिस्थीती लक्षात घेता मंडळाच्या विविध योजनांची अंमलबजावणी करणेसाठी वरील विषय क्र. २ मध्ये झालेल्या चर्चेनुसार शासनाकडुन नेमण्यात आलेल्या पाच IT Consultant पैकी KPMG या IT Consultant ची नियुक्ती करण्यात यावी,

| | | |
|---|---|---|
| | | अशी सुचना मा. मंत्री महोदय यांनी बैठकीत केली. त्यानुसार खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.<br><br>**ठराव: योजनांची अंमलबजावणी करणेसाठी वरील विषय क्र. २ मध्ये झालेल्या चर्चेनुसार शासनाकडुन नेमण्यात आलेल्या पाच IT Consultant पैकी KPMG या IT Consultant ची नियुक्ती करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.** |
| ५. | **मंडळामार्फत राबविण्यात येणा-या कल्याणकारी योजनांसाठी जनजागृती मोहीम राबविणेबाबत.** | याबाबत बोलताना मा. अध्यक्ष यांनी मंडळामार्फत राबविण्यात येणा-या कल्याणकारी योजनांची बांधकाम कामगारांमध्ये जनजागृती होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही करण्यात आली, याबाबत विचारणा केली. तसेच जनजागृती अभावी बांधकाम कामगारांना योजनेची माहितीच मिळाली नाही तर नोंदणी वाढणार कशी, असाही मुद्दा मा.अध्यक्ष यांनी उपस्थित केला.<br><br>मंडळाच्या दि.२४.१०.२०१६ च्या बैठकीत ठरल्यानुसार मंडळांतर्गत योजनांची जनजागृती करण्यात यावी किंवा कसे, याबाबत मा.उच्च न्यायालयाचे शासकिय |

Date 30/5/2017

अभियोक्ता यांचेकडून मार्गदर्शन मागविण्यात आले असल्याने त्यावर शासकिय अभियोक्ता यांचे मार्गदर्शन प्राप्त झाल्यानंतर सदर विषय चर्चेला घ्यावा असे मा.अध्यक्षांनी सुचित केले होते. तथापि. मा.उच्च न्यायालयाचे शासकिय अभियोक्ता यांचे मार्गदर्शन अद्याप अप्राप्त आहे. असे मंडळाच्या सचिव यांनी सर्व उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिले.

तसेच जनजागृती संबंधी करावयाच्या कार्यक्रमांची रूपरेषा मंडळाच्या सदस्यांनी तयार करून मंडळास पाठवाव्यात व त्या मंडळाच्या पुढील बैठकीत मंडळासमक्ष ठेवण्यात याव्यात व तद्नंतर मंडळांतर्गत करावयाच्या जनजागृती मोहीमेबाबत ठरविण्यात यावे. असा ठराव मंडळाच्या दिनांक ०५.१२.२०१६ रोजी पार पडलेल्या बैठकीत सर्वानुमते घेण्यात आला होता. त्यानुसार मंडळाचे कामगार प्रतिनिधी श्री. कुटास्कर यांनी त्यांचे पत्र दि. २०.१२.२०१६ अन्वये आपला प्रस्ताव मंडळाकडे सादर केलेला आहे. त्यामध्ये खालील माध्यमातून जनजागृती करण्यात यावी असे नमूद आहे.

१. पोस्टर तयार करणे.

२. एस.टी. बसेस. सिटी बसेस व शहरातील रिक्षांवर मंडळाच्या माहितीचे पोस्टर

"......We make it clear that the expenditure incurred by some of the State Government/Union Territories, particularly NCT of Delhi on advertisements with the amount collected is not at all appropriate and the amount that has been spent by the NCT of Delhi and other Union Territories/and States on Advertisement should be returned to the accounts of the construction workers....."

याबाबत मा. अध्यक्ष यांनी मंडळामार्फत राबविण्यात येणा-या कल्याणकारी योजनेची जनजागृती अभावी बांधकाम कामगारांना माहितीच मिळाली नाही तर नोंदणी वाढणार कशी, असा मुद्दा मा.अध्यक्ष यांनी उपस्थित केला.

यावर मंडळाच्या उपसचिव श्रीमती स्वेता सिंघल यांनी जाहिरातीवर खर्च करु नये, असे मा. न्यायालयाचे आदेश असल्याची बाब सर्व उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिली.

याबाबत बोलताना मा. अध्यक्ष यांनी यापुर्वी मंडळाने सुमारे ७० कोटीच्या जाहिराती केलेल्या होत्या. त्यामुळे त्यावर निर्बंध आणले असल्याचे स्पष्ट केले. तथापि, आता

Docs 30/50/7/ ?

मंडळ जाहिरातीवर खर्च न करता जनजागृती करणार आहे असे मा. अध्यक्ष यांनी सर्व उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिले.

त्यावर मा. मंत्री महोदय यांनी योजनांची जनजागृती होणे आवश्यक आहे तथापि त्यावर योग्य तितकाच (Appropriate) खर्च होणे अपेक्षित आहे. त्यासाठी वृक्षलागवड मोहिमे (Tree-plantation) प्रमाणे मंडळाच्या कल्याणकारी योजनांची जनजागृती करण्यासाठी दिनांक २५ एप्रिल ते १ मे या कालावधीत "**जनजागृती सप्ताह**" आयोजित करण्यात यावा. त्यामध्ये मुख्यालय स्तरावर एक मोठा Event आयोजित करण्यात यावा. तसेच प्रत्येक जिल्हा कार्यालय स्तरावर एक कार्यक्रम आयोजित करण्यात यावा. सदर Event ची विविध प्रसार माध्यमांद्वारे प्रसिद्धी देण्यात यावी. तसेच रेडिओ जिंगल्स, एस.टी. बसेस व एस.टी स्टँड वर होर्डींग्ज लावणे. फिरत्या वाहनांद्वारे मंडळाच्या योजनांची जनजागृती करणे. तसेच बांधकामाचया ठिकाणी व कामगारांच्या नाक्यावर मंडळाच्या योजनांचे मोठे फलेक्स लावणे. मंडळाच्या योजनांबाबतचे पुस्तक वाटप करणे, इत्यादीमार्फत मंडळाच्या योजनांची जनजागृती करण्यात यावी. सदर Event मध्ये बांधकामाशी संबंधित शासकिय प्राधीकरणांचा सहभाग घेण्यात यावा. सदर कार्यक्रमाचे